**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक- ७९/२०२३**
**महा. शासन वि. निवृत्ती कृष्णा पाटील**
**निशाणी क्रमांक- २७/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - ३ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

माझे नाव - स्वप्निल परसू कांबळे
वय - २९ वर्षे
व्यवसाय - व्यवसाय
पत्ता - कसबा तारळे, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

**१.** मी जखमी विद्या व त्यांचा मुलगा विनोद यांना ओळखतो. ते आमचेच गावचे रहिवासी आहेत. दि. १९/०३/२०२३ रोजी मी रात्री ९ वाजण्याचे सुमारास दुर्गमानवाड ते तारळे या रस्त्याने पायी चालत आलो. सदरील वेळी माझेपासून १५ ते २० फुट अंतरावर विद्या पाटील या तारळे च्या दिशेने चालत जात असल्याचे मला दिसले. सदरील वेळी मागून स्प्लेंडर मोटारसाईकल भरधाव वेगाने आली. सदरील मोटारसाईकलने विद्या पाटील यांना मागून धडक दिली. मी सदरील घटना पाहिली असता त्यांच्या दिशेने पळत गेलो.

**२.** तिथे गेल्यावर मी पाहिले की, मोटारसाईकलवर असलेले आरोपी क्र. १ व २ दोघे आणि विद्या या जमिनीवर पडलेल्या होत्या. विद्या यांना जखम झालेली होती. त्यांना उठवून मी त्यांचे मुले विनोद आणि शेखर यांना आवाज दिला. ती दोघे घरातून

बाहेर आले. आम्ही सर्वांनी आरोपी यांना देखील उठवले. आरोपी क्र. १ व २ पुन्हा मोटारसाईकलवर बसले. आरोपी क्र. १ व २ ने आम्हाला ते म्हासुर्ली गावचे असून दुर्गमानवाड येथे दर्शनाकरिता आले होते असे सांगितले. मोटारसाईकल चालवणाऱ्याने त्याचे नाव निवृत्ती व मागे बसलेल्याने त्याचे नाव अस्लम असे सांगितले. अस्लम सदरील वेळी मोटारसाईकलवरून खाली बाजूला चालू असलेल्या चर्चेकरिता उतरला असता निवृत्ती हा मोटारसाईकल घेऊन पळून गेला. सदरील वेळी आम्ही मोटारसाईकलचा क्रमांक पाहिला असता तो एम. एच. ०९ एफ. जी. ३७७६ असा होता.

**३.** सदरील वेळी विद्या या जखमी झाल्यामुळे आरडाओरड करू लागल्या. त्यांचे उजव्या हाताला व उजव्या मांडीला जखम झालेली होती. सदरील वेळी आरोपी अस्लम देखील तेथून पळून गेला. विनोद आणि शेखर यांनी त्यांची आई विद्या हिस गाडीत घालून दवाखान्यात नेले. त्यांना कोल्हापूर येथील दवाखान्यात नेल्याचे मला विचारल्यावर समजले. त्यांचे मांडीचे व मनगटाचे ऑपरेशन झाले. सदरील अपघात हा आरोपींच्या चुकीमुळे घडल्याचे मी पाहिले. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. साक्षीदाराने आरोपी न्यायालयात हजर असल्याचे सांगितले.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपींचे विधीज्ञ वकील यांचे विनंती वरून उलटतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

Sd/-

दिनांक : ०८/०१/२०२६

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

राधानगरी

**उलटतपास आरोपींचे विधिज्ञ वकील श्री. व्ही. बी. पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

**४.** माझे आट्‌र्समध्ये शिक्षण झाले आहे. माझे सर्विसिंगचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, दुर्गमानवाड फाटा ते तारळे जाणाऱ्या रस्त्यावर मटन विक्री, चाईनीज, दिपाली ट्रेडर्स, वाईन्स, हॉटेल आणि सरनोबत यांचे दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या दुकानांकरिता पार्किंगची सुविधा नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुर्गमानवाडच्या यात्रेकरिता दोन ते तीन लाख भाविक येतात. हे म्हणणे खरे आहे की, दुर्गमानवाडच्या यात्रेच्या दुसऱ्या दिवशी तारळे गावची यात्रा असते.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनेच्या वेळी रात्र असलेने अंधार होता. साक्षीदार सांगतो की, सदरील जागेत दिवे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या ४५ ते ५० फुट अंतरावर वीजेचा बोर्ड आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील वेळी घटनास्थळ असलेला रस्ता खराब होता. सदरील रस्त्याची रूंदी ही दोन वाहने जाऊ शकतील एवढी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील वेळी यात्रेमुळे माणसांची व वाहनांची सदरील ठिकाणी गर्दी होती. हे म्हणणे खरे नाही की, गर्दी मुळे सदरील ठिकाणांहून वाहन जोरात चालवणे शक्य नव्हते.

**६.** जखमी विद्या या रस्त्याच्या डाव्या बाजूने चालत होत्या. मी तपास ठिकाणात विद्या यांच्या ओरडण्याच्या आवाजाने घरातून त्यांचा मुलगा विनोद व शेखर आल्याचे सांगितले, त्यांचा आवाज ऐकून आणि मी दिलेला आवाज ऐकून ते दोघे बाहेर आले. मी पोलीसांना जबाब देतेवेळी मी विनोद व शेखर यांना आवाज दिला होता हे सांगितले होते. तसा मजकूर माझे जबाबत का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, विनोद व शेखर हे माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे

नाही की, विद्या या रस्त्याने जात असताना पडल्या व गाडीच्या धडकेने पडल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, विनोद आणि शेखर हे माझे मित्र असल्याने त्यांचे सांगण्यावरून मी आजरोजी न्यायालायत खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

Sd/-

दिनांक : ०८/०१/२०२६

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

राधानगरी